# महाविद्यालयात जागतिक कौशल्य विकास दिन साजरा




**श्रीपतराव चौगुले कॉलेजमध्ये जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त आयोजित केलेल्या व्याख्यान प्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य सुरेश पाटील समवेत डॉ.एस.एस.कुरलीकर,डॉ.बी.एन. रावण,डॉ.विजयकुमार पाटील,डॉ.मनीषा पाटील,डॉ.उषा पवार**

जागतिक युवा कौशल्य दिन दरवर्षी पंधरा जुलै रोजी साजरा केला जातो या दिनाचा उद्देश म्हणजे तरुणांमध्ये कौशल्य विकासाचे महत्त्व पटवून देणे तसेच शिक्षण प्रशिक्षण व रोजगार संधी यांच्यातील अंतर कमी करणे.बेरोजगार व उद्योजकतेला चालना देणे हा आहे असे प्रतिपादन डॉ. के. एस. चौगुले औद्योगिक प्रशिक्षण संस्था कोतोलीचे प्राचार्य मा.सुरेश पाटील यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज ,माळवाडी-कोतोली येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व कौशल्य विकास समिती यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त कौशल्य विकास आणि युवकांना रोजगार संधी या विषयावर आयोजित केलेल्या व्याख्यान प्रसंगी प्राचार्य सुरेश पाटील बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील होते.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ.विजयकुमार पाटील म्हणाले शिक्षणाबरोबर कौशल्य आत्मसात करणे गरजेचे आहे.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था सचिव शिवाजीराव पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रोफेसर डॉ.बी.एन. रावण,सहसमन्वयक डॉ.एस.एस. कुरलीकर,ज्युनिअर विभाग प्रमुख व सिनेट सदस्य डॉ.उषा पवार होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ.मनीषा पाटील यांनी केले आभार डॉ.एन.डी.मांगोरे यांनी मानले तर सूत्रसंचालन डॉ.यु.एन.लाड यांनी केले.

कार्यक्रमास सर्व शिक्षक,विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होत.